# ज्वारी पिकाचे सुधारीत लागवड तंत्र

कृषि विज्ञान केंद्र,यवतमाळ (डॉ. पंदेकृवि,अकोला)

---

ज्वारी हे विदर्भातील महत्वाचे तृणधान्य वर्गीय पिक असून धान्याबरोबर जनावरांचा चारा म्हणून कडब्यासाठी या पिकाची खरीप, रब्बी तसेच उन्हाळी हंगामामध्ये सुध्दा लागवड यवतमाळ जिल्हयामध्ये केल्या जाते.

शिफारशीत तंत्रज्ञानाचा वापर केल्यास ज्वारी धान्याचे तसेच कडब्याचे अधिक उत्पादन घेता येते त्यासाठी पुढील प्रमाणे बाबीचा अवलंब करणे काळाची गरज आहे.

१. **जमीन व पुर्व मशागत :** खरीप ज्वारी ही शक्यतोवर कोरडवाहू पिक म्हणून घेतल्या जाते परंतू रब्बी किंवा उन्हाळी हंगामात ज्वारीचे पिक घ्यावयाचे झाल्यास ओलीताची सोय असने आवश्यक आहे. या पिकासाठी मध्यम ते खोल/भारी व पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. रब्बी हंगामाचे पिक निघाल्यानंतर वखराच्या तिन ते चार खोल पाळया देवून जमीनीची चांगली पूर्व मशागत करावी.

२. **भर खते:** ज्वारी पिकाला साधारणत: कमीत कमी चार ते सहा बैलगाडया चांगले कुजलेले शेनखत किंवा कंपोष्ट खत प्रती एकरी शेवटल्या वखराच्या पाळी अगोदर देवून जमीनीत चांगले मिसळावे.

३. **रासायनिक खत:** मातीचे परीक्षण करून रासायनिक खताची मात्रा ठरवावी, सर्वसाधारण माती परीक्षणाचा अहवाल असल्यास शिफारशीत ३२ किलो नत्र, १६ किलो स्फुरद व १६ किलो पालाश प्रती एकरी दयावे यापैकी १६ किलो नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश पेरणीसोबत (३५ किलो युरीया + १०० किलो सुपर फॉस्फेट + २५ किलो म्युरेट ऑफ पोटॅश दयावा) व उरलेले १६ किलो नत्र (३५ किलो युरीया) पिक २५ ते ३० दिवसाचे असतांना दयावे.

४. **पेरणीची वेळ:** उन्हाळी हंगामात ज्वारी लागवड जानेवारीच्या १० ते १५ दरम्यान करावी.

५. **बियाण्याचे प्रमाण व पेरणीची पध्दत :** उन्हाळी ज्वारी पेरणीसाठी प्रती हेक्टरी ७.५ ते १० किलो म्हणजे एकरी ३ ते ४ किलो बियाणे पुरेसे आहे. ज्वारीची पेरणी ४५ सेंमी (१.५ फुट) च्या तिफनीने करावी. पेरणीसाठी दोन चाडयाच्या तिफणीचा उपयोग करावा जेनेकरून पेरणीसोबत खत देणे सोईचे होईल.

६. **ज्वारीचे सुधारीत वाण :**

| अ.क्र | वाणाचे नाव | परिपक्वतेचा कालावधी (दिवस) | हेक्टरी उत्पादन (क्विंटल) | |
|---|---|---|---|---|
| | | | धान्य | कडबा |
| १ | पिकेव्ही क्रांती (एकेएसव्ही १३ आर) | १२० ते १२५ | २५ ते ३० | ७० ते ७५ |

७. **विरळणी:** पेरणीपासून १५ ते २० दिवसानी विरळणी करावी. त्यासाठी दोन झाडातील अंतर १५ ते २० सेंमी इतके ठेवावे. विरळणी करतांना कमजोर खोडमाशी ग्रस्त रोपे काढून टाकावीत.

८. **ओलीत व्यवस्थापन:** उन्हाळी ज्वारीला ओलीताची अत्यंत आवश्यकता असते त्यामुळे पाण्याच्या उपलब्धतेनुसार पिकाच्या खालील अवस्थेत पाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

| अ.क्र | पिकाची अवस्था | पेरणी पासूनचे दिवस |
|---|---|---|
| १ | जोमदार वाढीची सुरूवात | ३५ ते ४० |
| २ | पोटरीत येण्याचा काळ | ६० ते ६५ |
| ३ | फुलोऱ्यात येण्याचा काळ | ७० ते ७५ |
| ४ | दाणे भरण्याचा काळ | ८५ ते ९५ |

या शिवाय पिकाची चांगली उगवण होण्यासाठी जमीनीत ओलावा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

९. **आंतरमशागत:** वेळोवेळी अंतरमशागत करून पिक सुरूवातीचे ४० ते ४५ दिवसापर्यंत तण विरहीत ठेवावे, त्यासाठी २ ते ३ डवरणीच्या पाळया व आवश्यकतेनुसार निंदणी करावी. तणनाशकाचा वापर करून देखील सुध्दा तणाचे नियंत्रण

करता येते. त्यासाठी २,४ - डी इथील ईस्टर ३८ टक्के ई.सी. हे तणनाशक पिक ३० ते ४० दिवसाचे असतांना ६० मिली प्रती १० लिटर पाणी याप्रमाणात घेवून तणावर फवारणी करून रुंद पानाच्या तणाचा बंदोबस्त करता येते.

१०.**कापणी व मळणी:** ज्वारी पिक परीपक्व झाल्याबरोबर कपणी व मळणी करावी. ज्वारी साठवणूकीच्या वेळी दाण्यातील ओलावा १० ते १२ टक्यांच्या वर असू नये.

११. **पिक संरक्षण:** ज्वारी पिकावर पुढील प्रमाणे किडींचा प्रादुर्भाव होतो.

| **अ.क्र** | **किडींचे नाव** | **व्यवस्थापन** |
|---|---|---|
| १ | खोडमाशी | वेळेवर पेरणी, बिजप्रक्रीया- इमीडाक्लोप्रीड ४८ टक्के १२ मिली प्रती किलो बियाणे, पेरणी वेळी कार्बोफ्युरॉन ३ टक्के दानेदार १३.२ किलो प्रती एकरी जमीनीतून प्रादुर्भाव ग्रस्त रोपे काढून नष्ट करणे, फवारणी- क्विनॉलफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली प्रती १० लि. पाणी |
| २ | खोडकिडा | पानावरील अंडीपुज पानासहीत तोडून नष्ट करणे, जैविक पध्दती- ट्रायकोग्रामा चिलोनीस परोपजीवी मित्र किटकाची अंडी ६० हजार प्रती एकर उगवणीनंतर ३० ते ४० दिवसांनी सोडावीत, प्रादुर्भाव दिसताच कार्बोफ्युरॉन ३ टक्के दानेदार ३.३२ किलो प्रती एकरी पोग्यामध्ये दयावे. |
| ३ | मावा | शिफारशीत अंतरावर पेरणी व खताची मात्रा, नत्रयुक्त खतांचा वापर प्रमाणात करावा. |
| ४ | तुडतूडे | |
| ५ | मिज माशी | डायमिथोएट ३० टक्के प्रवाही २० मिली किंवा फोझेलॉन ३५ टक्के प्रवाही १५ मिली प्रती १० लिटर पाणी |
| ६ | लष्करी अळी | शेत व बांध तणरहीत ठेवावे, जमीनीला भेगा पडल्सास ओलीत करावे. |

कृषि विज्ञान केंद्र,यवतमाळ-१ (डॉ. पंदेकृवि,अकोला)